VOL- IX | ISSUE- VII | JULY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# महाराष्ट्रातील चार दशकातील राजकारण व शासनांचा आढावा

**प्रा. डॉ. कमलाकर एन. राक्षसे**
राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
E-mail: kamlakar7662@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतात ख-या अर्थाने संसदीय राजकारणाला 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आल्यापासून सुरुवात झाली. इंग्लंडच्या कायदेमंडळाला लोकशाहीची जननी म्हणतात. (Mother of Democracy) भारतीय संसदीय प्रणाली इंग्लंडच्या संसदीय प्रणालीवरुन स्विकारण्यात आली आहे. पर्यायी भारताच्या घटक राज्यातही संसदीय पध्दती स्विकृत केलेली आहे.

मनुष्याला भौतिक सुख-सुविधा आणि जिविताची हमी देऊन त्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आधुनिक राष्ट्रराज्यात कल्याणकारी शासन (Welfare Government) उदयाला आले आहे. अर्थातच प्राचीन (पोलिसी स्टेट) ही जूनी संकल्पना निखळून पडलेली दिसून येते. म्हणूनच शासनाला मानवी कल्याणासाठी विस्तृतपणे कार्ये करावी लागतात. जगातील बहुतेक राष्ट्रांनी संविधाने निर्माण करून ती स्विकृत केलेली आहेत. त्यात भारताने सुद्धा संविधानाची निर्मिती करून ते स्विकृत करून 1950 ला त्याची अंमलबजावणी सुरू केली. भारतीय संविधानाच्या कलम एक मध्ये "India that is Bharat, shall be a Union of States" भारत राज्याचा संघ आहे, अशी स्पष्ट तरतूद केलेली आहे. परंतु त्याचे स्वरुप एक जिनसी दिसत नाही. काही राज्ये विकसीत आहेत, काही राज्ये विकसनशील तर काही बिमारु आहेत. महाराष्ट्र तसे विकसीत राज्य आहे. तांत्रिकदृष्ट्या भारतीय राजकारणाचा व्यवहार पाहिल्यानंतर त्यामध्ये व्यापकता दिसून येते तर राज्यपातळीवरचे राजकारण सुक्ष्म वास्तविकता (Micro Reality) किंवा उपव्यवस्था आहे. या दृष्टीकोनातून महाराष्ट्रात सरकारे स्थापित झालेली आहेत. सदर संशोधन पेपरमध्ये 1957 पासून महाराष्ट्रातील पक्षीय राजकारण अर्थात 1957 ची सार्वत्रिक निवडणूक आणि 1960 पासून महाराष्ट्रात स्थापन झालेले सरकार/शासन ते 1990 पर्यंत आलेली विविध सरकारे त्यांनी केलेले राजकारण व कार्य याचा थोडक्यात संशोधनात्मक आढावा घेण्यात आलेला आहे. सदर संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

सदर संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

1) चार दशकातील शासन व राजकारणाचा आढावा घेणे.
2) शासनानी केलेल्या कार्याचा लेखाजोखा मांडून वाचकांसमोर ठेवणे.

उपरोक्त उद्दिष्ट्ये समोर ठेवून चार दशकातील महाराष्ट्राच्या राजकारण आणि शासन यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर संशोधनासाठी पुढील गृहीतकृत्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) शासनाने समाधानकारक कामे केलेली आहेत.

2) याच काळात आघाड्यांच्या राजकारणांना सुरुवात झाली आहे.
3) देशाच्या राजकारणात 1990 नंतर पक्षीय स्पर्धा वाढली असली तरी महाराष्ट्रात मात्र 1990 पूर्वीच पक्षीय स्पर्धा वाढली आहे.

वरीलप्रमाणे गृहीतकृत्ये निश्चित करून संशोधन चौकटबद्ध केलेले आहे. महाराष्ट्रातील चार दशकातील राजकारण व शासनाच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत महाराष्ट्रातील पक्षीय राजकारणाने महत्त्वपूर्ण भूमिका वठवली. 1950 ते 1957 पासूनच महाराष्ट्रामध्ये पक्षीय राजकारणाच्या विकासात राष्ट्रीय पातळीवरील कॉंग्रेस पक्षाच्या प्रभूत्वाची नक्कीच पार्श्वभूमी आहे. 1956 नंतर महाराष्ट्रात मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती व्हावी यासाठी जनतेने आंदोलन तीव्र केले होते. याच काळात महाराष्ट्रात काँग्रेसह कम्युनिष्ठ, समाजवादी व जनसंघ या पक्षाखेरीज डाव्या विचारांचे पक्ष १९५७ साली स्थापन झालेला रिपब्लिकन पक्ष हे सर्व पक्ष काँग्रेस पक्षाला शह देण्यासाठी प्रयत्न करत होते; परंतु यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष अतिशय तळागाळातील लोकांपर्यंत नेऊन पक्षाची घडी अतिशय विस्तृत केली होती. मात्र १९६७ नंतर अनेक घटकराज्यामध्ये काँग्रेसला तडे जावून प्रादेशिक पातळीवर वेगवेगळे राजकीय पक्ष देशाच्या प्रादेशिक राजकारणाच्या रंगमंचावर जन्म घेऊ लागले; परंतु महाराष्ट्रात ही नवी राजकीय प्रक्रिया थोडी उशिरानेच सुरू झाली. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे अधिक प्राबल्य होते. पुलोदचा अपवाद वगळता १९९५ मध्ये युती शासन सत्तेवर येईपर्यंत काँग्रेस पक्षच सत्तेत राहिल्याचे दिसून येते. शिवसेना-भाजप युती सत्तेवर येण्याच्या अगोदरच्या शासनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती झाली. १ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबई हे द्वैभाषिक राज्य म्हणून पहिल्यांदा अस्तित्वात येवून काँग्रेस पक्ष बहुमताने निवडून येवून यशवंतराव चव्हाण हे भाऊसाहेब हिरे यांच्या पराभव करून मुख्यमंत्री बनले. भौगोलिक व महसुली या दोन्ही दृष्टीकोनातून हे राज्य भारतात सर्वात मोठे होते. अशा या विशाल द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री यशवंतराव चव्हाण यांनी शपथ घेतली. द्वैभाषिक राज्याचा निर्णय महाराष्ट्रीयन लोकांप्रमाणे गुजराती लोकांनाही मान्य नव्हता. गुजराती लोकांनी सुद्धा "महागुजरात जनता परिषद" स्थापन केली होती. या परिषदेच्या संयुक्त महाराष्ट्र समितीने पाठिंबा दिलेला होता.

## १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक

१९५७ साली देशातील लोकसभा, महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणूका झाल्या. यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती निवडणुकीत मोठ्या ताकदीने रिंगणात होती. या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला चांगलेय यश प्राप्त झाले होते. मराठी भाषिक प्रदेशातील लोकसभा निवडणुकीत ४४ पैकी २३ जागा प्राप्त झाल्या होत्या. विधानसभेच्या २६४ पैकी १२९ जागेवर संयुक्त महाराष्ट्र समितीला यश मिळाले होते. प्रस्तुत विधानसभा निवडणुकीत केवळ ६०० मताधिक्य घेऊन यशवंतराव चव्हाण निवडून आले होते.

संयुक्त महाराष्ट्र स्थापल्याशिवाय काँग्रेसला महाराष्ट्रात सत्ता काबीज करता येणार नाही हे या निवडणुकीत स्पष्ट झाले होते. यशवंतराव चव्हाण यांनी प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी पंडीत नेहरूंना यशवंतराव चव्हाण यांनी आमंत्रित केले होते. यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने नेहरूंसमोर निदर्शने केली होती.

महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने अनेक आंदोलने केली. अनेक लोकांनी या आंदोलनात हौतात्म्यही प्रसंगी स्वीकारले. याचा परिपाक म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्षश्रेष्ठीकडे

द्वैभाषिक मुंबई राज्याचा पुनर्विचार करण्याची विनंती केली. यानंतर अनेक घटना घडामोडीनंतर १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यांनीच आपल्या मुत्सद्देगिरीने संयुक्त महाराष्ट्राचा कलश महाराष्ट्रात आणला. यशवंतराव चव्हाण हे फक्त दोनच वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. तेच महाराष्ट्राचे शिल्पकार समजले जातात. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी विविध धोरणे, ग्रामीण भागात आर्थिक व राजकीय प्रक्रिया अधिक गतीमान केल्या. अर्थातच यशवंतराव चव्हाणांच्या कारकिर्दीत यशवंतराव चव्हाण सरकारने महाराष्ट्राच्या विकासासाठी विविध निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. पंचायत राज्याची स्थापना करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले. कसेल त्याची जमीन हा कुळ कायदा करून गरीब, कष्टकरी शेतकऱ्यांना दिलासा दिला. सहकारी चळवळी गतीमान करून ग्रामीण विकास केला. साखर कारखाने, जलविद्युत प्रकल्प, उद्योग, कृषी, शिक्षण इ. क्षेत्रात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे.

यशवंतराव चव्हाण शासनाला महाराष्ट्रात जास्त काम करता आले नाही. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. या आक्रमणानंतर नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना केंद्रात संरक्षण मंत्री पद दिले. त्यानंतर त्यांनी विविध खाती केंद्रात सांभाळली. यानंतर विदर्भातले नेते मारोतराव कन्नमवार यांच्या गळ्यात महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री म्हणून माळ पडली. ते एक ते सव्वावर्षच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांच्या शासनाने कापूस एकाधिकार खरेदी योजना, देणगीची रक्कम, स्वतःची भर घालून संरक्षण खात्याकडे वर्ग, शेतकरी, सामान्य माणूस, विकासाचा केंद्रबिंदू ओझरचा मित्र, किमान प्रकल्प, वटणगांव, भंडारा भद्रावती या ठिकाणचे संरक्षण साहित्य उत्पादन प्रकल्प. मारोतराव कन्नमवार यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनाने भारतीय सैन्यातील व्यक्तीकरिता व युद्धात मरण पावलेल्या अगर अपंग झालेल्या व्यक्तींच्या मुलांकरिता अनेक सवलती मंजूर केल्या. अशा प्रकारे कन्नमावर शासनाचा आढावा घेण्यात आला आहे.

यानंतर २५ नोव्हेंबर १९६३ ते ४ डिसेंबर १९६३ या काळात श्री. पी. के. सावंत यांची हंगामी मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. या शासनाचे मुख्यमंत्रीच हंगामी असल्यामुळे ठोस काही निर्णय / कामगिरी करता आलेली नाही. महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून वसंतराव नाईक यांनी ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ या कालखंडामध्ये काम केले. त्यांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनक म्हणून संबोधले जाते. त्यांनी १६ मार्च १९६३ रोजी मुख्यमंत्र्याची शपथ राज्यपाल अलीयार जंग यांनी दिली.

वसंतराव नाईक शासनाने ज्वारी, कापूस याची एकाधिकार पद्धतीने खरेदी सुरू केली. गाय, म्हैस यांच्या दुधाला एकच भाव, संकरीत गायीच्या खरेदीसाठी कर्जाची व्यवस्था, धवलक्रांती, मराठी राजभाषा इ. निर्णय या शासनाने घेतले. ग्रामीण रोजगार हमी योजना १ मे १९७२ पासून कार्यान्वित करण्यात आली. गरीबी हटाओ योजना, कृषि विद्यापीठाची निर्मिती, कमाल जमीन धारणा, कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, दारूबंदी धोरणात बदल, महाराष्ट्र लॉटरी, धान्याबाबत महाराष्ट्र राज्य स्वयंपूर्ण असे विविध प्रकल्प या शासनाने राबविले.

वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीनंतर शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले. त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणात 'हेडमास्टर' म्हणून संबोधले जाते. शंकरराव चव्हाण हे २१ फेब्रुवारी १९७५ ते १७ मे १९७७ अशी दोन सव्वा दोन वर्षे आणि त्यानंतर १२ मार्च १९८६ ते २६ मे १९७७ अशी साधारण सव्वा दोन वर्षे दुसऱ्यांदा असे दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. शंकरराव चव्हाण हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावान तसेच गांधी घराण्याचे निष्ठावान म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळखले जातात. त्यांना राजकारणाचा मोठा अनुभव होता. वसंतराव नाईकांनी आपल्या पदाचा राजीनामा देताच शंकरराव

चव्हाण यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी पुढे आले. त्यांनी राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात महाराष्ट्राचे नेतृत्व केलेले होते. त्यांनी जवळपास वीस खात्यांचा कारभार सांभाळलेला होता. त्यांनी महाराष्ट्रात शासनात मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले, त्याची अंमलबजावणी केली. शंकरराव चव्हाण यांच्या शासन काळात जायकवाडी प्रकल्प, उजनी, ईसापूर, पैनगंगा, अप्पर मांजरा, कापूस एकाधिकार योजना, आदिवासी आश्रमशाळा, उर्दू अकादमीची स्थापना, कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाची कडक अंमलबजावणी, भिकारी हटाव मोहीम म्हणजेच भीक मागण्याची प्रथा बंद करण्यासाठी योजना, अंमली पदार्थाच्या वापरावर बंदी, वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयांना विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्याचा ऐतिहासिक निर्णय यामधून ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे उघडून दिली. मराठवाडा ग्रामीण बँकेची स्थापना इ. विविध योजना राबवून महाराष्ट्राच्या विकासात मोठी भर घातली आहे.

दि. १७ एप्रिल १९७७ रोजी महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून वसंतदादा पाटील यांनी शपथग्रहण केली. त्यांनी अकरा महिन्याची मुख्यमंत्री पदाची कारकीर्द पार पाडली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र विधानसभेसाठी निवडणूका झाल्या. काँग्रेसला बहुमत मिळाले. वसंतदादा पाटलांची विधीमंडळ नेतेपदी निवड झाली. १९७८ रोजी पुन्हा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांनी आपल्या कार्यकाळात शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा, गणित व विज्ञान इंग्रजीतून शिकवण्याची योजना रद्द, सीमाप्रश्नी प्रधानमंत्र्यासोबत चर्चा करण्याचा निर्णय, मुंबईसाठी चौदा कोटी रुपयांचा रेल्वे विकास प्रकल्प, निळवडे धरण प्रकल्प इ. योजना वसंतदादा पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत सुरू केल्या. वसंतदादा पाटील यांच्या शासनाचा आढावा वरीलप्रमाणे घेता येईल.

जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू करण्यात आली. काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. १९७८ मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणूका झाल्या. वसंतदादा पाटील आणि नासिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री अशी योजना तयार करण्यात आली; पण वसंतदादा पाटीलांचे सरकार फार काळ टिकले नाही. १९७८ मध्ये शरद पवार सुशिलकुमार शिंदे, दत्ता मेघे, सुंदरराव साळुंखे यांना सोबत घेऊन सरकारमधून बाहेर पडले. त्यांनी शेकाप, जनता पक्ष आणि इतर मित्र पक्षांना बरोबर घेऊन 'पुरोगामी लोकशाही दल' या नव्या राजकीय आघाडीची स्थापना आणि वयाच्या ३८ व्या वर्षी महाराष्ट्राची धुरा खांद्यावर घेतली या राजकीय खेळीला वसंतदादा पाटील यांच्या पाठीत शरद पवार यांनी खंजीर खुपसला असे म्हटले जाते. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात शरद पवारांच्या माध्यमातून पहिले बिगर काँग्रेस शासन प्रस्थापित झाले. १९८० सालच्या लोकसभेत काँग्रेस पक्षाला श्रीमती इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली स्पष्ट बहुमत मिळाले. श्रीमती इंदिरा गांधी यांनी शरद पवार यांचे पुलोद सरकार बरखास्त केले. नंतर १९८५ साली महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेस पक्षाला १६२ जागा मिळाल्या. शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेस पक्षाला ५४ जागा प्राप्त झालेल्या होत्या. १९८६ साली शरद पवार इंदिरा काँग्रेसमध्ये परत आले. इंदिरा गांधीच्या हत्येनंतर त्यांचे चिरंजीव राजीव गांधी पंतप्रधान पदी आरूढ असताना त्यांनी शरद पवारांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी फेरनिवड केली होती. शरद पवार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी असताना महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांनी चाळीस कलमी कार्यक्रमावर भर दिला. पिडीत शेतकऱ्यांना कर्जमाफी, कृषि सिंचन आयोगाची स्थापना, गाव तिथे रस्ता, गायरान जमीन दुसऱ्यांना देणे, औद्योगिक वसाहती वाढवणे, वीज निर्मिती, पर्यटन, शेती विकास, महिला धोरण, १ ली ते ४ थी पर्यंत शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत दूध, मुलींना मोफत शिक्षण, महिला आयोग, मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव देणे इ.

१९८० मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या दोन टप्प्यात निवडणूका पार पडल्या. काँग्रेस पक्षाला १८६

जागा प्राप्त झाल्या. ८ जून १९८० रोजी बॅरिस्टर अब्दुल रहेमान अंतुले यांची कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसताना मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड करण्यात आली पुढे त्यांनी २३ नोव्हेंबर १९८० रोजी विधानसभेची पोटनिवडणूक लढविली आणि ते विधानसभेचे सदस्य बनले. बॅ. अंतुले हे केवळ १८ महिनेच मुख्यमंत्री पदावर राहिले. तडकाफडकी निर्णय घेणे ही त्यांची खासीयत होती. याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांची ४९ कोटी रुपयांची कर्जे माफ केली होती. त्यांच्या कारकिर्दीत अमरावती, नाशिक या दोन नव्या प्रशासकीय विभागांची निर्मिती तसेच लातूर, जालना व सिंधुदुर्ग या तीन नवीन जिल्ह्याची निर्मिती, कुलाबा जिल्ह्याचे रायगड असे नामकरण मुंबईत येणाऱ्या परप्रांतीयांचे लोंढे थांबवण्याची योजना त्यांच्याच कालखंडात आखली होती, नवी मुंबई रेल्वे मार्ग मंजूरी तसेच लंडनच्या म्युझियममधून शिवरायांची तलवार आण्ण्यास इंग्लंडला जाणे इ. निर्णय अंतुलेंच्या काळात घेण्यात आले.

१९८२ ते १९८३ या कार्यकाळात बॅ. बाबासाहेब भोसले यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. ते मुंबईतून आमदार म्हणून निवडून आले होते. त्यांच्या शासनाच्या कार्यकाळात मुलींना १० वी पर्यंत मोफत शिक्षण, अमरावती विद्यापीठाची स्थापना गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती, औरंगाबाद येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ इ. महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

३ जून १९८५ ते १३ मार्च १९८६ या काळात शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. त्यांच्या शासनाने मागासलेल्या भागासाठी कृती आराखडा, विदर्भ कोकण, मराठवाडा विकासासाठी काही विशिष्ट कार्यक्रम, पहिली ते बारावी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण, वीजपुरवठ्यात वाढ, पीक विमा योजना, एम.आय.डी.सी., तालुका पातळीवर, पर्यावरण विभागाची निर्मिती इ. निर्णय घेतले. त्यांची अंमलबजावणी केली.

२५ जून १९९१ ते ५ मार्च १९९३ या कालखंडात सुधाकर राजुसिंग नाईक या वैदर्भिय नेत्याची मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या कार्यकाळात पुढील निर्णय घेण्यात आले. अनेक महामंडळाच्या अध्यक्षांना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा, दुष्काळावर मात, जलसंधारण या नव्या खात्याची निर्मिती महिला व बालकल्याणासाठी स्वतंत्र विभाग, चैत्यभूमीच्या विकासासाठी पाच कोटी रुपयाची मदत इ. अनेक निर्णय त्यांच्या शासनाच्या कालखंडात घेण्यात आले. ते शरद पवारांचे वारसदार म्हणून मुख्यमंत्री पदी निवडले गेले होते.

**संदर्भ सूची**

1) फडके, य. दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड 7 वा.
2) करडेकर अनिल शेषराव, महाराष्ट्राची वाटचाल, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
3) पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङ्मय, मुंबई.
4) केळसे अनंत, (सीपीए, संकलक) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई.
5) मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे.
6) सिरसीकर व.म. आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
7) भोळे भा. ल., यशवंतराव चव्हाण साहित्य आणि राजकारण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.